महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(१) ५४३ (२२-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षकांची सुमारे दिड हजार वा त्याहून अधिक पदे रिक्त असल्याने गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१८) : (१) होय हे अंशत: खरे आहे,

रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षक संवर्गाची ७७८१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७०२५ पदे कार्यरत असून ७५६ पदे रिक्त आहेत. मात्र रिक्त पदामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

(२) रिक्त पदे भरण्याबाबत शासन निर्णय २३.०६.२०१७ नुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांच्या ऑफलाईन संच मान्यतेतील त्रुटीबाबत

(२) ३१६९१ (१८-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची यापूर्वी ऑफलाईन संच मान्यताही शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रमाण संख्येवर निश्चित होत होती, त्यानुसार शाळांना धरुन असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात ५० ते ६० विद्यार्थी व पदवी महाविद्यालयाला जोडून असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये ५० ते १२० विद्यार्थ्यांसाठी तुकडयांना मान्यता देण्यासाठीची सर्व प्रक्रिया ऑफलाईन म्हणजेच प्रत्यक्ष कॉलेजवर जाऊन केली जात असे वा प्रत्यक्ष विभागात कॅम्प लावून ही गणना केली जायची, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुरु असणाऱ्या ऑफलाईन संच मान्यतेतील त्रुटीमुळे शेकडो अनुदानीत तुकड्या बंद पडून १० हजारांवर शिक्षकही अतिरिक्त ठरणार असल्याने सर्वात मोठा फटका लाखो विद्यार्थ्यांना बसून या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकड्यांमध्ये प्रवेश घ्यावा लागून त्यांच्यावर अवाजवी फी चा भूर्दंड पडणार असल्याने या ऑनलाईन संच मान्यतेला अनेक शिक्षक संघटनांनी व विद्यार्थ्यांनी विरोध करुन पुर्वीप्रमाणेच ऑफलाईन संच मान्यता करावी अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व कार्यवाहीबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शिक्षक संघटनानी केलेली मागणी खरी आहे. तथापि १० हजारावर शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याचे खरे नाही.

(३) त्रुटी आढळलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या सन २०१४-१५ संचमान्यता ऑफलाईन करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वस्ती शाळा शिक्षकांचे नियुक्तीचे आदेश प्रलंबित असल्याबाबत

(३) ३३३५९ (२३-१२-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ३३ वस्तीशाळा शिक्षकाना नियमित शिक्षक नियुक्तीचे आदेश जिल्हा प्रशासन विभागाकडून दिले गेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्ती शाळा शिक्षकांचे नियुक्तीचे आदेश प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली अहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील ३३ वस्तीशाळा शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी केलेल्या चौकशी नुसार ३३ पैकी पात्र ठरलेल्या २९ शिक्षकांना दि.०५.११.२०१५ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सोलापूर यांनी नियुक्तीचे आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात संगणक सॉप्टवेअरमध्ये १२० विदयार्थ्यांसाठी एक तुकडी शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ८०-१०० तसेच वैयक्तिक विषयासाठी सुध्दा तसाच रेशो ठरविण्याबाबत

(४) ३५४६९ (२४-०२-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१४-१५ पासून संचमान्यतेचे धोरण अंगिकारले असून संगणक सॉप्टवेअरमध्ये १२० विदयार्थ्यांसाठी एक तुकडी शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ८०-१०० तसेच वैयक्तिक विषयासाठी सुध्दा तसाच रेशो ठरविण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे हजारो कनिष्ठ प्राध्यापक अतिरिक्त ठरणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास जळगांव जिल्हा कनिष्ठ प्राध्यापक संघटनेच्या मेळाव्यात संचमान्यतेच्या शासन निर्णयाची होळी करण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) हे अशंत: खरे आहे.
शासन निर्णय २८.०८.२०१५ नुसार संचमान्यता करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही,
अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नही.

जिल्हा परिषदेच्या (ता.भुसावळ) उर्दू शाळा व उर्दू भाषा शिकविणा-या शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासबाबत

(५) ४०३२३ (२७-०६-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळांमधील शिक्षकांची पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्दू शाळा व उर्दू भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासन निर्णय दि.२३.०६.२०१७ नुसार कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील अनुदानीत व शासकीय शाळांमध्ये गेली अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याबाबत

(६) ४४८९८ (१६-०५-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत व शासकीय शाळांमध्ये गेली अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे रिक्त ठेवण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, सदर पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०१५ व २०१६ केंद्रीय भरती निवडपूर्व प्रक्रीया राबविण्याचे विचाराधीन असल्यामुळे पदे रिक्त राहिली होती. तथापि आता शासन निर्णय २३.०६.२०१७ नुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील अनेक गावांतील प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीकरीता निधी मिळण्याबाबत

(७) ४५३४५ (०३-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील अनेक गावांतील प्राथमिक शाळांच्या इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांच्या दुरुस्तीकरिता शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन या इमारती दुरुस्त करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील एकूण ४०३ शाळांपैकी ३२० शाळा सुस्थितीत असून ३६ शाळांना किरकोळ दुरूस्तीची व ४७ शाळांना मोठया दुरूस्तीची गरज आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत व जिल्हा नियोजन समितीमार्फत शाळा दुरूस्तीकरिता वेळोवेळी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विविध संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत

(८) ४८२११ (२५-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विविध संवर्गातील सुमारे १३३ पदे रिक्त असून सदर पदे तातडीने भरण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

पाचोरा तालुक्यात विविध संवर्गातील ९० पदे रिक्त आहेत.

(२) व (३) बिंदुनामावली पडताळणी न होणे सेवानिवृत्तीमुळे, भरती प्रक्रीयेत बदल होणे इ.कारणांमुळे सदर पदे रिक्त आहेत.रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्हयात कमी विदयार्थी असेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विदयार्थी शिक्षकांचे अन्य नजिकच्या शाळांमध्ये समायोजन करुन सदर शाळा बंद करण्याचा निर्णयाबाबत

(९) ४८९७७ (२५-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयात कमी विदयार्थी असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विदयार्थी शिक्षकांचे अन्य नजिकच्या शाळांमध्ये समायोजन करुन सदर शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाने शिक्षकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) या सर्व शाळेवर संच मान्यता सन २०१३-१४ मध्ये प्रत्येकी दोन शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आलेली असल्याने कार्यरत असलेले १० शिक्षक अतिरीक्त ठरल्याने त्यांचे समायोजन अन्य शाळेवर करण्यात आलेले आहे. त्यामुळे शिक्षकांचे नुकसान झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून प्राथमिक शिक्षणातील इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी बाबतचे शासकीय आदेश

(१०) ५४०३३ (२६-०९-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्राथमिक शाळेतील शिक्षणातील इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी ची पुनर्रचना, इयत्ता १ ली ते ५ वी प्राथमिक व इयत्ता ६ वी ते ८ वी उच्च प्राथमिक अशी केली आहे काय,
(२) असल्यास, असे करताना शासकीय शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी व इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गामध्ये विद्यार्थी संख्येची किती अट राहणार आहे,
(३) तसेच माध्यमिक शाळेतील ८ वीच्या वर्गातील पटसंख्या किती राहणार आहे,

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय २८.०८.२०१५ व त्यानंतर वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार विद्यार्थी संख्येचे निकष निश्चित केले आहेत.

नागपूर जिल्ह्यातील महानगरपालिका व जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्यामुळे मनपातील २८६ तर जिल्हा परिषद शाळेतील २७० शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याबाबत

(११) ५७७८१ (२६-०९-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील महानगरपालिका व जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे मनपातील २८६ तर जिल्हा परिषद शाळेतील २७० शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी मनपा शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २७ हजार असून शाळांमधील शिकवणी वर्गाचा दर्जा घसरल्याने विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेत प्राथमिकचे२३५ व माध्यमिक ३५ असे एकूण २६७ शिक्षक तर मनपामध्ये २८६ शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा परिषद व मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची कमी झालेली पटसंख्या वाढविण्याकरीता तसेच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत. ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) दिनांक २२ जून, २०१५ व दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दु माध्यमिक विद्यालय, जवाहरनगर, कोल्हापूर या शाळेतील मुख्याध्यापक पदाच्या बनावट प्रस्तावाबाबत

(१२) ७०१४६ (०५-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दु माध्यमिक विद्यालय, जवाहरनगर, कोल्हापूर या शाळेत हुसेन महंमद भालदार हे सन २००२ ते २००५ या कालावधी शिक्षक म्हणून कार्यरत असतांनाच दिनांक १४ जुलै, २००१ रोजी पृथ्वी माध्यमिक विद्यालय, वाठार, ता.हातकणंगले येथे लिपिक म्हणून काम पाहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान नि्दर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उर्दु शाळेच्या शिक्षिका नसीनम सुलतान मोमीन यांनी शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे दिलेल्या लेखी खुलाश्यात ही बाब स्पष्टपणे नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २००५ ला उपरोक्त शिक्षक हे सदर शाळेतील मुख्याध्यापक पदाचा बोगस प्रस्ताव देऊन मुख्याध्यापक बनल्याची बाब शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या संच निश्चितीमध्ये दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे नाही.

(४) व (५) चौकशीअंती श्री.भालदार हुसेन महंमद यांना दि.१४.१२.२०१५ पासून सेवेतून बडतर्फे केले असून सद्या ही बाब मे.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायाप्रविष्ठ आहे.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सेंट जोसेफ हायस्कुलमधील विद्यार्थीनीला डांबून ठेवल्याबाबत

(१३) ७६५१० (२०-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील नवीन पनवेल येथील सेंट जोसेफ हायस्कुल मधील चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या कु.ऋषी कदम, या विद्यार्थिनीला तसेच त्याच जिल्हयातील खालापूर गावातील जीजेएम या इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनाने, फी भरली नाही म्हणून विद्यार्थ्यांस वर्गात डांबून ठेवल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे शहरातील सावरकर नगरमधील ज्ञानोदय विद्यामंदिरात शाळेची फी भरली नाही म्हणून वर्गशिक्षीकेने दुसरीतील विद्यार्थिनीचे केस उपटले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेंट जोसेफ हायस्कुलमध्ये फी वाढ, विद्यार्थ्यांशी गैरवर्तन, १० वीतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका जाळणे या सारखे वेगवेगळे प्रकार यापूर्वीही घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुलीला वर्गात डांबून ठेवल्याप्रकरणी पालक खांदेश्वर पोलीस ठाण्यात प्रशासनाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यास गेले असता टाळाटाळ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सेंट जोसेफ हायस्कुल, पनवेल, जि.रायगड या शाळेच्या प्राथमिक विभागाची मान्यता का रद्द करण्यात येऊ नये याबाबत नोटीस दिली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच, ज्ञानोदय विद्यामंदिर सावरकर नगर, ठाणे या शाळेतील संबंधित शिक्षिकेला निलंबित करण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्हयातील मराठी व उर्दु माध्यमाच्या प्राथमीक व उच्च प्राथमीक शाळांमध्ये मुख्यध्यापकाची पदे रिक्त असल्याबाबत

(१४) ७९९८८ (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात मराठी व उर्दु माध्यमाच्या एकूण ८३ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा मुख्याध्यापकाविना सुरु असून त्याचा शिक्षणाबरोबर प्रशासकीय कामांवर परिणाम जाणवत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या ८३ शाळांतील मुख्याध्यापकांचा कारभार इतर शिक्षकांना देण्यात आला असून, मंजूर शिक्षकांपैकी ६३ टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने आढावा घेवून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याबाबत शासन निर्णय २३.०६.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्य शिक्षक परिषदेला शासनाची मान्यता मिळण्याबाबत

(१५) ८६४४५ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, पदव्युत्तर शिक्षक यांचे व्यवसायिक व सामाजिक हिताचे प्रश्न घेवून काम करणाऱ्या राज्य व्यापी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेला शासनाची मान्यता मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेने शासनाकडून मान्यता मिळविण्यकरिता विहीत नमुन्यात प्रस्तावही सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार उक्त परिषदेस शासनाची मान्यता मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व पुण्यातील अनेक शाळांच्या आवारातील दुकानांमूधन शालेय वस्तू अवाजवी भावाने विकल्या जात असल्याबाबत

(१६) ८६६०९ (२३-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुण्यातील अनेक शाळांच्या आवारातील दुकानांमूधन केंद्रीय शिक्षण मंडळाने शाळांच्या परिसरात शैक्षणिक वस्तू विकण्यास बंदी घातलेली असतांनाही शालेय वस्तू अवाजवी भावाने विकल्या जात असल्याबाबतची तक्रार युवासेनेने शिक्षण उपसंचालक यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तक्रारीतील मागणीच्या अनुषंगाने उक्त शांळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ११.०६.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांनी मुख्याध्यापकांना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सावनेर (जि.नागपूर) येथील भालेराव हायस्कुलमध्ये मुलींकरीता शौचालय सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

(१७) ८९३४५ (२३-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जि.नागपूर) येथील भालेराव हास्कुलने देशभर राबवित असलेल्या स्वच्छ भारत अभियान योजनेकडे दुर्लक्ष करुन शाळेत मुलींकरीता पटसंख्येनुसार शौचालय बांधले नसल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शाळा प्रशासन व इतर संबंधीत अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३१-०१-२०१८) : (१) होय.
(२) गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी चौकशी केली आहे. सध्या शाळेत एक शौचालय उपलब्ध असून एक शौचालय बांधण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच पटसंख्येनुसार शौचालय उपलब्ध नसल्याबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकांकडून खुलासा घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदनाबाबत

(१८) ९०३१२ (२३-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन लोकप्रतिधींनी मा. शालेय शिक्षण मंत्र्यांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, उक्त निवेदनात शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे आकृतीबंध वेतन पथक, शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक कार्यालयातील रिक्त पदे भरणे, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती योजनेसाठी कॅशलेस पध्दत अंमलात आणणे आदि मागण्यांचा समावेश असून या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३१-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील शिक्षकांच्या मागण्यांबाबत वित्त विभाग, सा.आरोग्य विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे आवश्यकतेनुसार पाठपुरावा करण्यात येत आहे.

राज्यात मध्यान्ह भोजन योजनेतर्गत असलेला केंद्रसरकारचा निधी कमी झाल्याबाबत

(१९) ९१०५९ (२३-०८-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दुरावलेल्या बालकांची उपस्थिती वाढावी आणि त्यांना पोष्टीक अन्न मिळून कुपोषणालाही आळा बसावा याकरिता गत २२ वर्षापासून सुरु असलेल्या मध्यान्ह भोजन योजनेतंर्गत केंद्र सरकारचा निधी गत तीन वर्षात कमी झाला असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर योजनेसाठी आवश्यक निधी केंद्र सरकारकडून मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापर्यत केंद्र : राज्य निधीचे प्रमाण ७५:२५ टक्के असे होते. तथापि, केंद्र शासनाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून सदर निधीचे प्रमाण ६०:४० टक्के असे केले आहे.
(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थी संख्येच्या आधारे निधीची मागणी वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये नमूद करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रकल्प मान्यता मंडळाकडे सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय पोषण आहारातील वस्तू पुरविण्यासाठी दोनशे टक्केपेक्षाही अधिक दराचा फायदा मिळविणाऱ्या ३३ जिल्हयातील पुरवठादारांना मुदतवाढ न देण्याबाबत

(२०) ९१८६५ (२३-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पोषण आहारातील वस्तू पुरविण्यासाठी शासनाकडून दोनशे टक्केपेक्षाही अधिक दराचा फायदा मिळविणाऱ्या ३३ जिल्हयातील पुरवठादारांना मुदतवाढ न देण्याचा शिक्षण विभागाचा आदेश मिळण्यापूर्वीच राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक सुनिल चौहाण यांनी त्या पुरवठादारांकडून पुढील दोन महिने काम करुन घेण्याचे आदेश दिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर व सोलापूर या जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजना बंद केली असल्याबाबत

(२१) ९३९५४ (२३-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर व सोलापूर हे दोन जिल्हे वगळता सन २०१७-१८ या वर्षासाठी शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासाठी नविन निविदा काढण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यात शालेय पोषण आहार योजना बंद केली गेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यात शालेय पोषण आहार बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार उक्त जिल्ह्यानां शालेय पोषण आहार पुर्ववत चालू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कोल्हापूर व सोलापूर या २ जिल्ह्यांमध्ये तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदारासोबत केलेला करारनामा अस्तित्वात असल्याने सदर जिल्हे वगळून उर्वरित जिल्ह्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यामध्ये सदर पुरवठेदारामार्फत धान्यादी मालाचा पुरवठा व तांदूळ वाहतूक सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिक्षण संचालक, पुणे यांनी मुद संपल्यानंतरही जुन्या ठेकेदाराकडून शालेय पोषण आहार पुरवठा सुरु ठेवल्याबाबत

(२२) ९३९५५ (२३-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासाठी पुरवठा करण्याचा करारनामा दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास समाप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ६ जून, २०१७ रोजी शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांनी विद्यार्थ्यांचे हाल होऊ नये याकरिता जून्याच पुरवठा धारकांकडून पुरवठा करण्याचे आदेश सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी दुष्काळामुळे बाजारात माल कमी आल्यामुळे दर जास्त असल्याने तर यावर्षी माल पुष्कळ आल्याने दर कमी झाले असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होऊ नये या करिता मागील पुरवठा धारकाकडून पुरवठा करण्यापेक्षा केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रति विद्यार्थी प्रति दिन आहार निधी खर्च शाळा स्तरावर वितरीत करण्याबाबतचे आदेश शासनाने दिनांक १९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांनी शासनाच्या दिनांक १९ जून, २०१७ च्या आदेशाचे उल्लंघन करुन दिनांक ६ जून, २०१७ रोजी त्यांनी जून्याच पुरवठ्या धारकाकडून पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच आर्थिक नुकसानीची भरपाई शासन शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांच्याकडून वसूल करणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१), (२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी सन २०१६-१७ साठी नियुक्त पुरवठेदाराचा करार दि.१४/०६/२०१७ रोजी संपला आहे. त्यामुळे आहारात खंड पडू नये यासाठी जुन्या पुरवठेदारांना मुदतवाढ न देता नवीन पुरवठेदारांची नियुक्ती होईपर्यंत केंद्र शासनाने ठरवून दिलेला प्रती विद्यार्थी प्रती आहार खर्च निधी शाळास्तरावर वितरीत करण्याचा निर्णय शासनाने दि.१९/०६/२०१७ च्या पत्रान्वये घेतला आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकाने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची छळवणूक केल्याबाबत

(२३) ९३९६१ (२१-०८-२०१७). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद मध्ये अर्थशास्त्र प्राध्यापक डॉ.पवार यांनी संशोधन कारणाऱ्या विद्यार्थांची छळवणूक केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२). असल्यास, या बाबत वेळोवेळी विद्यार्थ्यांची छळणूक होत असल्याची लेखी स्वरुपाच्या तक्रार असूनही या बाबत विद्यापीठाकडून कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत प्राध्यापका संदर्भात विद्यापीठाने व विभागाप्रमुखाने शासनाला चूकीचा पत्रव्यवहार केलेला असून या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विद्यापीठाने दि. ०२.०९.२०६ रोजीच्या पत्रान्वये डॉ.पवार यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला होता. डॉ. पवार यांनी दि. ०८.०९.२०१६ रोजी याबाबत खुलासा सादर केला. तसेच विद्यापीठातील कथील गैरव्यवहाराबाबत सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (उ. व तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत याबाबत चर्चा होऊन डॉ.पवार यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात यावी असे सूचित करण्यात आले. त्यानुसार सदर प्रकरणी मा.कुलगुरू यांनी श्री.एस.के. माळी, सेवानिवृत्त कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांची समिती गठीत करण्यात आली असून विद्यापीठाने दि.१८.०७.२०१७ च्या पत्रान्वये डॉ.माळी यांची सदर समितीवर काम करण्यास सहमती मिळण्याबाबत विनंती केली आहे. अद्यापी त्याच्याकडून सहमती प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अंबोली (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील कॉ.नानासाहेब मालुसरे माध्यमिक विद्यालयातील मुलास शिक्षकाने केलेली मारहाण

(२४) ९५०५६ (२९-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंबोली (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील कॉ.नानासाहेब मालुसरे माध्यमिक विद्यालयातील नववी इयत्तेत शिकत असलेल्या मुलास शिक्षकाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मारहाण केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) होय, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती त्र्यंबकेश्वर जि.नाशिक यांनी दि.४.१२.१७ रोजी चौकशी केली आहे. चौकशीनुसार सदर घटनेत तथ्य असल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील बेजनबाग येथील गुरुनानक प्राथमिक विद्यालयातील विदयार्थ्याला केलेली मारहाण

(२५) ९५९४४ (२९-१२-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील बेजनबाग येथील गुरुनानक प्राथमिक विद्यालयातील ४ थीमध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्याने मध्यान्ह भोजन घेण्यास मनाई केल्यामुळे तेथील शिक्षिका जेनीफर काळे यांनी त्यास मारहाण केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शाळेवर तथा शिक्षिकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, शाळा च्यवस्थापन समितीद्वारे संबंधित शिक्षिकेस ताकीद देण्यात आली आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तंत्रशिक्षण महाविद्यालय संस्था संचालकांनी व प्राचार्यांनी अनेक त्रुटी असतांनाही खोटी प्रमाणपत्रे दिली असल्याबाबत

(२६) ९६२९५ (२९-१२-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील व्यावसायीक महाविद्यालयाची तंत्रशिक्षण संचालकांनी तपासणी केली असता अनेक त्रुटी असतांनाही संस्था चालकांनी व प्राचार्यांनी खोटी प्रमाणपत्रे दिल्याचे आढळून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३४६ व्यावसायीक महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीसा पाठवल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने खोटी माहिती व प्रमाणपत्रे सादर करुन फसवणूक करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

मुदतवाढीसाठी मान्यता घेताना संबंधीत संस्थांकडून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेला प्रमाणपत्रे परस्पर सादर करण्यात येतात.

(२) अंशत: खरे आहे.

(३) दोषी महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्याची बाब अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अधिकार कक्षेतील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याबाबत

(२७) ९६३३५ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेल्या मागणीसंदर्भात पडताळणी करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाला कळविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी क्षेत्रीय कार्यालयाकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील अहवालानुसार शासनाने येवला येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) होय.

(२) होय.

(३) तंत्रशिक्षण संचालनालयाने सादर केलेल्या अहवालानुसार पदविका अभ्यासक्रमांच्या (तंत्रनिकेतन) बाबत नाशिक विभाग व जिल्हयातील रिक्त जागांचे प्रमाण मागील तीन वर्षापासून सतत वाढत आहे. नाशिक जिल्हयांतील रिक्त जागांची टक्केवारी २८.६०% (सन २०१४-१५) वरून ४९.२३.% (सन २०१६-१७) पर्यंत वाढलेली आहे. तसेच नाशिक विभागातील शैक्षिणिक वर्ष २०१६-१७ करिता अल्पसंख्यांकाच्या प्रवेशात आकडेववारी वरून असे निदर्शनास येते की, केंद्रिय प्रवेशाच्या (CAP) ७५% जागा रिक्त आहेत. नाशिक जिल्हयातील व येवला तालूक्यातील सद्या सुरू असलेल्या तंत्रनिकेतनामध्ये रिक्त जागांचे प्रमाण जास्त असल्यामुळे येवला जिल्हा नाशिक येथे नविन शासकीय तंत्र निकेतन स्थापन करण्याचे आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांचे लेखापरीक्षणच होत नसल्याबाबत

(२८) ९६४०० (२९-१२-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाचा विनियोग योग्य प्रकारे झाला आहे किंवा कसे याद्दष्टीने खाजगी प्राथमिक शाळांचे लेखापरीक्षण गत २० वर्षापासून करण्यांत आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार उक्त खाजगी प्राथमिक शाळांचे लेखापरीक्षण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काये आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) व (२) अंशत खरे आहे.

सन २००४-०५ ते २०१२-१३ या कालावधीत वेतनेतर अनुदान बंद होते. संबंधित संस्था/शाळांचे खाजगी सनदी लेखापालामार्फत लेखापरीक्षण करण्यात येते. तसेच, शिक्षणाधिकारी संबंधित शाळांचे अनुदान निर्धारण करुन शाळांना वेतनेत्तर अनुदान मंजूर करतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) शहरामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थिनींकरीता वसतीगृह बांधण्याबाबत

(२९) ९६४७८ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थिनींकरीता वसतीगृह बांधण्याकरिता जागा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार नाशिक जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरावरून माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रस्ताव मागविलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी येवला येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरीता वसतीगृह बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) होय.
(२) व (३) ज्या ठिकाणी वसतिगृह बांधवयाचे आहे त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या उच्चशिक्षणाच्या सुविधा, जवळपासच्या शैक्षणिक संस्था, मागणी व त्या परिसरातील अल्पसंख्यांकाची लोकसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन नाशिक जिल्ह्यात जागेचा शोध घेण्यात येत आहे.

नॅक किंवा एनबीएचे मूल्यांकन न केल्यास अशा महाविद्यालयांना सन २०१९-२० पासून राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती देण्यात येणार नसल्याबाबत

(३०) ९६५८३ (२९-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नॅक किंवा एनबीएचे सन २०१८-१९ अखेरपर्यंत मूल्यांकन न केल्यास अशा महाविद्यालयांना शासनाने सन २०१९-२० पासून राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती न देण्याचा निर्णय घेतल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटची जबाबदारी ही महाविद्यालयाची असणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
किमान ५० टक्के इतक्या प्रवेशित विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळवून देण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालय/ तंत्रनिकेतन यांची राहिल, अशी अट निर्धारीत करण्यात आली आहे.
(३) वरील अटी शासन निर्णय, क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४,दि.३१/०३/२०१६ व शासन निर्णय, क्र.टीईएम-२०१६/ प्र.क्र. ५०१/तांशि-४, दि.१३/१०/२०१६ अन्वये शासनाने जाणीवपूर्वक निर्धारीत केल्या आहेत. जेणेकरुन महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक दर्जा टिकवला जाऊन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल व त्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होऊ शकतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विद्यार्थी वर्गांना शालेय पुस्तके देण्याबाबत

(३१) ९६८१८ (२९-१२-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून शालेय पुस्तके देण्यात येत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये शासनाने नविन नियम लागु केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नविन नियमानुसार विद्यार्थी वर्गांनी प्रथम पुस्तके खरेदी करुन त्यांची पावती मुख्याध्यापकाकडे देणे अनिवार्य केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदरहू नियमामुळे गरिब कुटुंबातील विद्यार्थी पुस्तके मिळण्यापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठयपुस्तक योजनेचा लाभ शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा यामधील इ.१ ली ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय आहे. सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतात. तथापि, शासनाने दि.०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेचा लाभ वस्तुस्वरुपात न देता लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यावर वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेची अंमलबजावणी सन २०१८-१९ पासून प्रस्तावित आहे.

राज्यातील विनाअनुदानित शाळामध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अल्पसंख्याक संस्थाना ३० पटाऐवजी २० चे पट करण्याबाबत

(३२) ९७४२६ (२९-१२-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विनाअनुदानित शाळामध्ये अल्पसंख्याक संस्थाना ३० पटाऐवजी २० पट करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई चे औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्णय देण्यात येवूनही याबाबत कोणताही आदेश काढण्यात आला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विनाअनुदानित शाळामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अल्पसंख्याक संस्थाना ३० पटाऐवजी २० चे पट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) होय.
(२) धोरणात्मक बाब असून याबाबत आवश्यक कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार निकृष्ट दर्जाचा मिळत असल्याबाबत

(३३) ९७४५३ (२९-१२-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यास सुरु करण्यात आलेल्या पोषण आहार योजनेत कडधान्याचीही तरतूद केली असताना या पोषण आहारात निकृष्ट दर्जाच्या अन्नधान्याचा वापर होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्हयातील प्रथमिक शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या शासन पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या खिचडीसाठी तांदूळ वगळता पोषण आहाराचे साहित्यासाठी लागणारा खर्च हा प्रथम शिक्षकांनी करावा तद्दनंतर सदर खर्च शिक्षकांना दिला जाईल असा आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांनी पोषण आहारासाठी खर्च केलेला २ कोटी १८ लाख रुपयांचा निधी अद्याप मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नवीन पुरवठेदार नियुक्त होईपर्यंत पात्र विद्यार्थ्यांना आहार उपलब्ध करुन देण्यासाठी शाळास्तरावर निधी वितरीत करण्याचा निर्णय शासनाने दि.१९/०६/२०१७ च्या पत्रान्वये घेतला होता. त्यानुसार आहार शिजविणाऱ्या यंत्रणांनी धान्यादी माल खरेदी करावयाचा असून त्याची देयके सादर करुन मुख्याध्यापकामार्फत देयकांची अदायगी करण्याची तरतूद आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतर करणेबाबत

(३४) ९७४७३ (२९-१२-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरीत करुन तेथे अद्यावत शासकीय अभियांत्रिकी

महाविद्यालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी व त्यापूर्वीही शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थानाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी हस्तांतरणाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरीत करुन तेथे अद्यावत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) होय.

(२) होय.

(३) राज्यात ८ शासकीय अभियांत्रिकी व ४ शासन अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये कार्यरत आहेत. तसेच राज्यातील ६ शासकीय तंत्रनिकेतनांतील पदविका अभ्यासक्रमांचे पदवी अभ्यासक्रमात श्रेणीवर्धन करुन नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा परिस्थितीत शासनास अधिकचे दायित्व स्विकारता येणार नाही. त्यामुळे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हया महाविद्यालयास शासन अनुदानित करण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरातील विभागीय क्रीडा संकुलाचे काम अपुर्ण असल्याबाबत

(३५) ९८४३६ (२९-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विभागीय क्रीडा संकुलाचे काम गत अनेक वर्षापासून प्रलंबित असून मैदानामध्ये दारुडयांचे अड्डे तयार झाले असून अनेक मैदानांची दुरावस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिवाजी स्टेडियमचीही दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील मैदानाची दुरावस्था दुर करण्याकरिता तसेच क्रीडा संकुलाच्या कामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

शिवाजी स्टेडियम मधील क्रिकेट खेळपट्टीची दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु असून क्रिकेट खेळपट्टीच्या सुरक्षेसाठी बॅरीकेटिंग तयार करण्यात आले आहे.

(३) विभागीय क्रीडा संकुलात कोणत्याही प्रकारची दुरावस्था झालेली नाही. सद्यस्थितीमध्ये शुटींग रेंजचे ९७% काम झालेले असून निविदेप्रमाणे शिल्लक कामे पूर्ण झाल्यानंतर वास्तुविशारद यांचे अभिप्रायाप्रमाणे ही सुविधा संकुल समितीकडे हस्तांतरीत करुन घेण्यात येत आहे. तसेच १०, २५ व ५० मी. शुटींग रेंजचे आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी शिल्लक निधीतून ई निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

जलतरण तलाव व डायव्हिंग तलावाचे ५०% काम झाल्यानंतर त्याच्या तळाकडील बाजूने पाण्याचे उमाळे येत असल्याने सदर तलावाचे काम सध्या बंद आहे. याकरिता कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली असून त्यांना सुधारित आराखडा सुचविन्यास निर्देशित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरेगाव भिमा (ता.शिरूर, जि.पुणे) येथील शाळांना सेंट्रल किचन पद्धतीने पोषण आहार देण्याबाबत

(३६) ९९०७५ (२९-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव भिमा (ता.शिरूर, जि.पुणे) येथे जिल्हा परिषद प्राथिमक केंद्र शाळेतील पोषणआहार उघड्यावरच शिजविला जात असल्याचे दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त शाळेत पावसाळ्यात देखील भर पावसात पोषण आहारातील भात शिजविला जात असल्याने शाळेतील ४८१ मुलांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांना सेंट्रल किचन पद्धतीने पोषण आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) व (२) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोरेगांव भिमा, जि.पुणे या शाळेमध्ये अन्न शिजविण्याचा गॅस सिलेंडर दि.०७/०७/२०१७ रोजी संपल्याने त्या दिवशी शाळेच्या आवारात चुलीवर आहार शिजविण्यात आला. गॅस सिलेंडरची व्यवस्था केल्याने दुसऱ्या दिवसापासून नियमितपणे शाळेच्या स्वयंपाकगृहात आहार शिजवून देण्यात येतो.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे पात्र शाळांना तयार आहाराचा पुरवठा करण्याची तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या केंद्रीय प्रवेश परिक्षेला (सी.ई.टी) बसलेल्या विद्यार्थ्यांची माहिती अभियांत्रीकी महाविद्यालयांना त्यांच्या मार्केटींगसाठी विकली जात असल्याबाबत

(३७) ९९०९९ (२९-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या केंद्रीय प्रवेश परिक्षेला (सी.ई.टी) बसलेल्या १ लाख ७ हजार विद्यार्थ्यांची माहिती फुटली असून सदर माहिती अभियांत्रीकी महाविद्यालयांना त्यांच्या मार्केटींगसाठी विकली जात असल्याची बाब दिनांक ३० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सी.ई.टी.ला बसलेल्या विद्यार्थ्यांची माहिती तंत्रशिक्षण संचनालय आणि महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडे (एम.के.सी.एल.) असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) तंत्र शिक्षण संचालनालयाच्या स्तरावर चौकशी समिती नियुक्त केली असून, चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनुदानास पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना पात्र टप्प्यानुसार अनुदान देण्याबाबत

(३८) ९९२३४ (२९-१२-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानास पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना पात्र टप्प्यानुसार अनुदान देण्याबाबत तसेच मूल्यांकनात अनुदानास पात्र ठरलेल्या अघोषित शाळांची यादी तत्काळ घोषित करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.वित्त मंत्री, मा.शिक्षण मंत्री, याना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने अनुदानास पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अद्याप अनुदान देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३१-०१-२०१८) : (१) होय.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला येथील बी.आर.हायस्कूलच्या लिपिकाने भविष्य निर्वाह निधीची रक्कम मंजूर करण्यासाठी मुख्याध्यापकापासून कमीशन घेतल्याबाबत

(३९) ९९४४० (२९-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील बी.आर.हायस्कूलच्या लिपिकाने भविष्य निवार्ह निधीची ५ लाख ५० हजार रुपयांची रक्कम मंजूर करण्यासाठी मुख्याध्यापकापासून एक टक्क्याने कमीशन घेतल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनानेचौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भविष्य निर्वाह निधीच्या मंजूरीसाठी कमिशन घेणाऱ्या लिपिकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) संबंधीत लिपीकाच्या दोन वेतनवाढी संस्थेने रोखल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील महाविद्यालयाच्या अनुदानपात्र याद्या तात्काळ घोषित करुन अनुदान मंजूर करण्याबाबत.

(४०) ९९७७३ (२९-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत अनेक वर्षापासून (कायम) विनाअनुदान तत्वावर सुरु असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व कनिष्ठ महाविद्यालयांच्या अनुदान पात्र याद्या अद्यापपर्यंत घोषित केलेल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना गत १७ वर्षापासून कमी वेतनावर काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनास दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी व त्यापुर्वीही अनेकवेळा निवेदने पाठवून उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अनुदान पात्र याद्या घोषित करुन १०० टक्के अनुदान मंजूर करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे, तसेच याविषयी शासनाचे धोरण काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) होय.
(२) शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे.
(३) होय.
(४) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अनुदानित माध्यमिक शाळामधील वाढीव व अतिरिक्त तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत

(४१) ९९७८१ (२९-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुदानित माध्यमिक शाळामधील बिगर आदिवासी क्षेत्रातील ५७१८ व आदिवासी क्षेत्रातील २५५ अशा एकूण ५९७३ अशा नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना व अतिरिक्त तुकड्यांना विना अनुदान तत्वावर दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णया नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २००८ ते २०१४ मध्ये मान्यता देण्यात आलेल्या विना अनुदानित तुकड्या नैसर्गिक वाढीनुसार अनुदान वितरित करावे याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी अचलपूर यांनी शालेय शिक्षण विभाग यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णय दिनाक ११ ऑक्टोबर, २००० अन्वये अनुदान सत्र विहीत करण्यात आले असल्याने त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षापासून ह्या तुकड्या २० टक्के अनुदानास पात्र ठरतात याबाबतचा स्पष्ट उल्लेख दिनांक १६ ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ मध्ये देण्यात आला असून अशा शाळाना शाळा सुरु झाल्याच्या ५व्या वर्षीपासून २० टक्के व उर्वरित टप्प्या टप्प्याने अनुदान देण्यात यावे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णयानुसार अद्यापपर्यंत अनुदान पात्र अतिरिक्त तुकड्यांना व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) व (२) होय.
(३) व (४) सन २००१ पासून विनाअनुदानित शाळा व तुकड्या देण्याचे धोरण संपूष्टात आलेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळा (ता.आष्टी, जि.बीड) येथील प्राथमिक शाळेच्या इमारतीचे वादळामुळे नुकसान झाल्याबाबत

(४२) १००३४५ (२९-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळा (ता.आष्टी, जि.बीड) येथील प्राथमिक शाळेच्या इमारतीचे वादळाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर शाळेच्या इमारतीची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३१-०१-२०१८) : (१) होय.
(२) व (३) कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, बीड यांनी केलेल्या पाहणीमध्ये या शाळेच्या वर्गखोल्या धोकादायक असल्याचे आढळून आले. उपलब्ध निधीतून वर्गखोल्यांची दुरूस्ती करण्याबाबत उचित कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्गखोल्या दुरूस्तीसाठी मा.खासदार, बीड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा कायापालट समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्राध्यापकांच्या वेतनाकरिता केंद्राकडून येणाऱ्या ८० टक्के अनुदानाबाबत

(४३) १००४९३ (२९-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनातील ८० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान स्वरूपात मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यशासन प्राध्यापकांच्या वेतनावर केवळ २० टक्के रक्कम खर्च करते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने प्राध्यापकांच्या भरतीवर बंदी आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार केंद्राकडून येणाऱ्या अनुदानाबाबत तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) व (२) नाही.
(३) व (४) वेतनावरील खर्च नियंत्रित करण्यासाठी वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/ अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये पदनिर्मिती व पदभरती यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.
(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग परिपत्रक क्र.संकिर्ण २०१२/(२३७/१२)/विशि-१, दि.१७.०९.२०१३ मधील तरतुदीनुसार रिक्त पदांवर तासिका तत्वावर नियुक्त्या करुन अध्यापनाचे काम करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कायम शब्द निघालेल्या विनाअनुदानित शिक्षकांना न्याय मिळणेबाबत

(४४) १००८५८ (२९-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कायम शब्द निघालेल्या विना अनुदानित शिक्षकांना न्याय मिळेपर्यंत आत्मक्लेश आंदोलन म्हणून पायात चप्पल न घालण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीने आत्मक्लेश आंदोलन माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१८) : (१) होय.
(२) (अ) दिनांक १ व २ जुलै रोजी अनुदानास पात्र घोषित शाळांना निधीची तरतूद करणे, (ब) अघोषित शाळा घोषित करणे, (क) १६२८ शाळा व वर्ग तुकडयांना प्रचलित नियमानुसार अनुदान देणे, (ड) क्षेत्रीय स्तरावरील प्रलंबित असलेले अनुदानाचे प्रस्ताव मागविणे (इ) सन २०११-१२, २०१२-१३ मध्ये मान्यता दिलेल्या वर्ग तुकडयांचे मूल्यांकन करणे.

(३) (अ), (ब) व (ड) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे. (क) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ नुसार सरसकट २० टक्के अनुदान सूत्र लागू करण्यात आले आहे. (इ) सन २००१ पासून विनाअनुदानित शाळा व तुकडया देण्याचे धोरण संपूष्टात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरु होऊनही गणवेश वाटप करण्यात आले नसल्याबाबत

(४५) १०२१८२ (३०-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरु होऊन पाच महिन्यांचा कालावधी लोटला तरीही गणवेश वाटप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०१-२०१८) : (१), (२) व (३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी गणवेश खरेदी करुन त्याची पावती शाळेकडे जमा केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात गणवेशाची रक्कम जमा करण्याची तरदूत करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत ठाणे जिल्हयामध्ये एकूण पात्र ६८७७४ विद्यार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम संबंधित शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीकडे वितरीत करण्यात आली आहे. ६८७७४ पात्र विद्यार्थ्यापैकी ३५९८० विद्यार्थ्यांची खाती उघडण्यात आली आली असून यापैकी ३३७०८ पात्र विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये लाभाची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांची बँकेत खाती न उघडल्यामुळे त्यांच्या खात्यावर योजनेच्या लाभाचे पैसे वर्ग करता आलेले नाहीत. तथापि, सदर लाभार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयातील शालेय पोषण आहार शिजवून देणारे कर्मचारी यांना मागील सहा महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याबाबत

(४६) १०२५७९ (२९-१२-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहार शिजवून देणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल २०१७ पासून मानधन मिळाले नसल्याचे तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील शाळांमध्ये पोषण आहार शिजवून देणारे ठेकेदार इंधन आणि भाजीपाल्याच्या खर्चापोटी दिल्या जाणाऱ्या मानधनापासून वंचित असल्याचे माहे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शाळेत शालेय पोषण आहार शिजवून देणा-या कर्मचाऱ्यांना मिळणारे तुटपुंजे मानधन व तेही वेळेवर मिळत नसल्यामुळे आहार शिजवून देण्याची प्रक्रिया बंद होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे शालेय पोषण आहाराची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करणेची मागणी पालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना मानधन देणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयातील सांगोला व मंगळवेढा तालुके वगळता उर्वरित तालुक्यांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंतचे स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन अदा करण्यात आले असून सदर दोन तालुक्यांमधील कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे थकित मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मध्यान्ह भोजनाची व्यवस्था करण्याबाबत

(४७) १०२७१८ (३०-१२-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मध्यान्ह भोजनाकरिता मिळणारा धान्य मालाचा पुरवठा माहे सप्टेंबर, २०१७ पासून शासनाने बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य पुरवठा बंद केल्यामुळे माहे ऑक्टोबर, २०१७ पासून मध्यान्ह भोजन बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त बदं करण्यात आलेले मध्यान भोजन पुर्ववत चालु ठेवणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०१-२०१८) : (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ वाहतुक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी जुन्या पुरवठेदाराची दि.१४/०६/२०१७ रोजी मुदत संपली होती. निविदा प्रक्रियेद्वारे नवीन पुरवठेदार नियक्त होईपर्यत धान्यादी मालाची खरेदी करण्यासाठी संबंधित शाळेच्या अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी देण्यात आली होती. याअंतर्गत अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी १५ दिवसांकरीता धान्यादी माल खरेदी करुन शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजवून द्यावयाचा आहे. तांदळाचा पुरवठा पुरवठेदारामार्फत करण्यात येत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे नवीन पुरवठेदार नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि, सदर निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिकदृष्टया आवश्यक पात्र निविदाकार न मिळाल्यामुळे सदर निविदा प्रकिया रद्द करण्यात आली. त्यामुळे सदर जिल्हयासाठी पुनर्निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. काही शाळांमध्ये शालेय पोषण आहार बंद असल्याने याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, भंडारा याच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात नियमबाहय करण्यात आलेल्या कुलसचिवांच्या निवडीबाबत

(४८) १०२७८४ (२९-१२-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात महाराष्ट्र युनीव्हर्सिटी ॲक्ट-१९९४ नुसार तसेच कुलससचिवांची निवड समिती गठित न करता कुलगुरूंनी नियमबाहय कुलसचिवांची निवड केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कुलसचिवांच्या नियमबाहय नियुक्तीमुळे वेतनाचे दायित्व स्वीकारले नसल्याने विद्यापीठाने विद्यापीठ निधीमधून कुलसचिवांचे वेतन अदा केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार नियमबाहय नियुक्ती व विद्यापीठ निधीची गैरवापर करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठाने केलेली कुलसचिवाची नियमबाह्य नियुक्ती रद्द करून विद्यापीठाच्या कुलसचिव पदावर शासनाच्या अधिकारांतर्गत नियुक्ती करावयाचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्यास तसेच विद्यापीठाने केलेल्या कुलसचिवाच्या तात्पुरत्या नियुक्तीचे वेतन व आनुषंगिक बाबी विद्यापीठाने शासनास सादर करावयाच्या प्रस्तावाच्या तपासणीच्या अधीन राहून विद्यापीठ निधीतून अदा करण्यात याव्यात असे शासनस्तरावरून विद्यापीठास कळविण्यात आले. तद्नंतर विद्यापीठाकडून प्राप्त प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८ (५) मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या कुलसचिव पदावर ६ महिन्यांसाठी अथवा कुलगुरूंकडून नवीन कुलसचिवाची यथोचितरित्या नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तेवढ्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती दि.१४ मार्च, २०१७ च्या आदेशाच्या दिनांकापासून करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात एकही स्वच्छ विद्यालय नसल्याबाबत

(४९) १०२८८३ (३०-१२-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानांतर्गत जाहीर केलेल्या स्वच्छ विद्यालय पुरस्कारात कोल्हापूर जिल्हयात एकही स्वच्छ विद्यालय नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त जिल्हयातील विद्यालयांना स्वच्छ विद्यालय पुरस्कार मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, स्वच्छ विद्यालय पुरस्कारात उक्त जिल्हयातील एकही शाळा नसण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१८) : (१) नाही.

(२) सद्य:स्थितीमध्ये कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २०१६-१७ या वर्षात १६८८ शाळांनी सहभाग नोंदवला होता व १३८५ शाळांनी माहिती भरुन स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यापैकी ३५ शाळा ग्रीन झोन (९०% ते १००%) मध्ये समाविष्ट होत्या.

सन २०१७-१८ मध्ये कोल्हापूर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनाच्या ३६८१ शाळांपैकी ३६६२ शाळांनी सहभाग नोंदविला होता.

३३४२ इतक्या शाळांनी माहिती भरली असून २५२ शाळा ग्रीन झोन म्हणजेच (९०% ते १००%) इतक्या गुणांकणामध्ये आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

क्रिडा कार्यालयाने गटशिक्षणाधिकारी, सोलापूर (जि.सोलापूर) यांना नोंदणी झालेल्या १०१२ शाळांना वाटप करण्यासाठी फुटबॉल दिले नसल्याबाबत

(५०) १०२९५२ (२९-१२-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मिशन फुटबॉल १ मिलियन अंतर्गत राज्यात एकाच दिवशी १० लाख विद्यार्थ्यांची फुटबॉल किक पडणार असल्याची योजना राबविली असून त्यासाठी प्रत्येक शाळांना तीन फुटबॉल देण्याचे नियोजन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिडा कार्यालयाने गट शिक्षणाधिकारी, सोलापूर (जि.सोलापूर) यांना नोंदणी झालेल्या १०१२ शाळांना वाटप करण्यासाठी फुटबॉल दिले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.